**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२- २९४५१००१
**Email ID – pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक ३५० दिनांक १६-१२-२०२१

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीत ऑल ऑपरेशन राबऊन अवैध व्यवसाय व गुन्हेगारांवर कारवाई.

दिनांक १३/१२/२०२१ रोजी रात्री ११:०० ते दिनांक १४/१२/२०२१ रोजी सकाळी ०३:०० वाजेपावेतो मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील व सर्व पोलीस ठाणेकडील एकुण १६९ पोलीस अधिकारी व ५४४ पोलीस अंमलदार यांनी संयुक्तरित्या ऑल-आउट ऑपरेशन राबविले. सदर कारवाई दरम्यान अवैध दारु विक्री करणारे, जुगार खेळणारे, अवैधरित्या घातक शस्त्रे कब्जात बाळगणारे त्याचप्रमाणे दाखल गुन्हयांतील फरार व पाहिजे आरोपीतांचा शोध घेवून अटक करण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये एकुण ३१ ठिकाणी नाकाबंदी लावून ३८३ बेशिस्त वाहनचालकांवर विविध कलमांन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. सदर मोहिमेदरम्यान मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अवैध दारु विक्री / वाहतुक / उत्पादन / बाळगणे | ३२ |
| २ | अवैध जुगार | ०३ |
| ३ | गुटखा / तंबाखुजन्य | ०४ |
| ४ | अवैध शस्त्र जप्ती (कोयते/तलवारी/सुरा/इ.) | ०२ |
| ५ | पाहिजे आरोपी अटक (संख्या) | १३ |
| ६ | अभिलेखावर तपासलेले आरोपी (संख्या) | २२९ |
| ७ | वाहन तपासणी (संख्या) | १४८२ |
| ८ | अंमली पदार्थ विरोधी कारवाई (एनडीपीएस) | ०४ |
| ९ | अंमली पदार्थ विरोधी कारवाई (एनडीपीएस) सेवन करणारे | ३८ |
| १० | म.पो.का.क.१४२ अन्वये कारवाई | ०२ |
| ११ | म.पो.का.क. १२२ अन्वये कारवाई (रात्रीच्यावेळी गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरित्या फिरणे) | ०५ |
| १२ | मोटार वाहन कायदयान्वये करण्यात आलेली कारवाई | ३८३ |

----000---